CMYK

आचारसंहितेचे उल्लंघन होतेय ? मग, सी व्हिजिल ॲपवर तक्रार करा >> पान 2

निवडणूक खर्च निरिक्षक बुलढाण्यात दाखल ; खर्चविषयक बाबींचा घेतला आढावा >> पान 3

लोकांच्या भल्यासाठी लोकांनी महायुतीचे उमेदवार मोठ्या संख्येने विजयी करावेत - केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव >> पान 4


**सुविचार**

अहींसेचे पहीले धडे मी माझ्या लग्नामध्ये शिकलो – महात्मा गांधी

# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034



अभिषेक आणि ऐश्वर्या यांच्या घटस्फोटाच्या अफवांदरम्यान 'बिग बीं'ची पोस्ट चर्चेत

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई आतील पान

■ दैनिक ■ बुलढाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 79 ■ शुक्रवार, दि. 25 ऑक्टोबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची पहिली यादी जाहीर

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात विधानसभा निवडणुकीची रंधुमाळी पाहायला मिळत आहे. एवढ्या, सर्वच राजकीय पक्षांनी विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी याद्या जाहीर करण्याचा सपाटा लावलाय. गुरुवारी (२४ ऑक्टोबर) राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षानं पहिली उमेदवार यादी जाहीर केली. जयंत पाटील यांनी पुण्यात पत्रकार परिषद घेत ४५ उमेदवारांच्या नावाची घोषणा केली. बारामती मतदारसंघाकडं सर्वांचं लक्ष लागलं होतं. येथून शरद पवार यांनी युगेंद्र पवार यांना उमेदवारी दिली. त्यामुळं बारामतीत पवार विरुद्ध पवार असा सामना रंगणार आहे.



४५ उमेदवारांची यादी जाहीर : राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची पहिली यादी जाहीर करण्यात आली. पुण्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी पहिली यादी जाहीर केली. ही पहिली यादी असून दुसरी यादी पुढील दोन दिवसांमध्ये जाहीर करणार असल्याचं पाटील म्हणाले. इस्लामपूरमधून जयंत पाटील, काटोल मतदारसंघातून अनिल देशमुख, घनसावंगीमधून राजेश टोपे, कराड उत्तरमधून बाळासाहेब पाटील यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. मुंब्रा कळवा मतदारसंघातून जितेंद्र आव्हाड यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली.

### राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या पहिल्या यादीतील उमेदवार

जयंत पाटील – इस्लामपूर
अनिल देशमुख– काटोल
राजेश टोपे– घनसावंगी
बाळासाहेब पाटील– कराड उत्तर
जितेंद्र आव्हाड– कळवा मुंब्रा
शशिकांत शिंदे – कोरेगाव
जयप्रकाश दांडेगावकर– वसमत
गुलाबराव देवकर– जळगाव ग्रामीण
हर्षवर्धन पाटील– इंदापूर
प्राजक्त तनपुरे –राहुरी
अशोकराव पवार– शिरूर
मानसिंगराव नाईक– शिराळा
सुनील भुसारा– विक्रमगड
रोहित पवार– कर्जत जामखेड
विनायकराव पाटील– अहमदपूर
राजेंद्र शिंगणे– सिंदखेडराजा
सुधाकर भालेराव– उदगीर
चंद्रकांत दानवे– भोकरदन
चरण वाघमारे– तुमसर
प्रदीप नाईक– किनवट
विजय भांबळे–जिंतूर
पृथ्वीराज साठे– केज
संदीप नाईक– बेलापूर
बापूसाहेब पठारे– वडगाव शेरी
दिलीप खोडपे– जामनेर
रोहिणी खडसे– मुक्ताईनगर
सम्राट डोंगरदिवे–मुर्तिजापूर
रविकांत बोपछे– तिरोडा
भाग्यश्री अत्राम– अहेरी
बबलू चौधरी– बदनापूर
सुभाष पवार– मुरबाड
राखी जाधव– घाटकोपर पूर्व
देवदत्त निकम– आंबेगाव
युगेंद्र पवार – बारामती
संदीप वर्पे– कोपरगाव
प्रताप ढाकणे– शेवगाव
राणी लंके– पारनेर
मेहबूब शेख– आष्टी
करमाळा–नारायण पाटील
महेश कोठे–सोलापूर शहर उत्तर
प्रशांत यादव– चिपळूण
समरजीत घाटगे – कागल
रोहित आर आर पाटील–तासगाव कवठेमहाकाळ
प्रशांत जगताप –हडपसर

## धक्कादायक! पाण्याची टाकी कोसळून पाच कामगारांचा मृत्यू

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** भोसरी येथील सद्गुरु नगरजवळ पाण्याची टाकी कोसळून मोठी दुर्घटना घडल्याचे समोर आले आहे. आज सकाळी सात वाजेच्या सुमारास लेबर कॅम्पमध्ये राहणाऱ्या कामगारांवर अचानकपणे पाण्याची टाकी कोसळली. या घटनेत पाच कामगारांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून परिसरातून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

घटनेची माहिती मिळताच, पोलिस आणि अग्निशामक दल तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. सध्या प्रशासनाकडून या घटनेचा तपास सुरू मृतदेह बाहेर काढण्याचे प्रयत्न चालू आहेत.

दरम्यान, अचानक पाण्याची टाकी कोसळण्याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. मात्र या घटनेमुळे बांधकामाच्या दर्जावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. तसेच प्रशासनाने या दुर्घटनेची चौकशी सुरु केली असून संबंधित कंत्राटदारावर कारवाई होण्याची शक्यता देखील वर्तण्यात येत आहे.

## तीन दिवसांपूर्वी पक्षप्रवेश केलेल्या उमेदवाराला ठाकरेंकडून तिकीट; महायुतीकडून कोणता उमेदवार?

दैनिक आपला विदर्भ

**वाशिम/प्रतिनिधी :** शिवसेना उद्धव बाळाबाहेब ठाकरे पक्षाकडून बुधवारी (२३ ऑक्टोबर) रात्री ६५ जणांची पहिली यादी जाहीर करण्यात आली. यात वाशिम विधानसभा मतदार संघातून डॉ. सिद्धार्थ देवळे यांना उमेदवारी देण्यात आलीय. मात्र, अद्यापही येथून महायुतीकडून कुठल्याच उमदवाराची घोषणा करण्यात आली नसल्यानं विद्यमान आमदार लखन मलिक यांना पुन्हा उमेदवारी मिळणार की नवीन चेहऱ्याला संधी दिली जाणार? याबाबत कमालीची उत्सुकता वाढली आहे.

वाशिम जिल्ह्यात तीन विधानसभा मतदारसंघ येतात. यापैकी वाशिम विधानसभा मतदार संघातून शिवसेना ठाकरे गटानं डॉ. सिद्धार्थ देवळे यांना उमेदवारी जाहीर केली आहे. त्यामुळं उर्वरित कारंजा आणि रिसोड मतदार संघातून महाविकास आघाडीकडून कुणाला संधी मिळणार, याकडं जिल्हावासियांचं लक्ष लागलंय.

वाशिम मंगरुळपीर विधानसभा मतदारसंघ भाजपाच्या ताब्यात आहे. इथून लखन मलिक मतदारसंघाचं नेतृत्व करतात. मात्र, यावेळेस मलिक यांना डच्चू मिळणार असल्याच्या जोरदार चर्चा आहेत. असं असलं तरी, वाशिम, कारंजा आणि रिसोड येथून भाजपा कुणाला उमेदवारी देणार, हे पाहणं महत्त्वाचं ठरेल.

रिसोड विधानसभा मतदारसंघ काँग्रेसचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो. त्यामुळं येथून विद्यमान आमदार अमित झनक यांची उमेदवारी पक्की मानली जात आहे. तर कारंजा मतदारसंघावर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाकडून दावेदारी केली जात आहे. येथून कोणता उमेदवार देण्यात येईल याबाबत तर्क–वितर्क लावले जात आहेत. शिवसेना शिंदे गटानं जाहीर केलेल्या यादीत वाशिम जिल्ह्यातील एकाही मतदार संघाचा समावेश नाही.

# समीर भुजबळ नांदगावमधून अपक्ष निवडणूक लढवणार?

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** नांदगाव विधानसभा मतदारसंघातून महायुतीने विद्यमान आमदार सुहास कांदे यांना उमेदवारी दिली आहे. मात्र, या मतदारसंघातून छगन भुजबळ यांचे सुपूत्र समीर भुजबळ इच्छुक आहेत. महत्त्वाचे म्हणजे समीर भुजबळ हे नांदगाव मतदारसंघातून लवकरच अपक्ष उमेदवार म्हणून अर्ज दाखल करणार असल्याचीही माहिती आहे. त्यानंतर आता राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आलं आहे. दरम्यान या चर्चावर आता मंत्री राष्ट्रवादी काँग्रेसचे ( अजित पवार ) नेते छगन भुजबळ यांनी भाष्य केलं आहे.



छगन भुजबळ हे आज येवला विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. त्यापूर्वी त्यांनी आज माध्यमांशी संवाद साधला. यावेळी समीर भुजबळ यांच्या अपक्ष लढण्याच्या चर्चाबाबत विचारण्यात आलं. यासंदर्भात बोलताना समीर भुजबळ हे त्यांचा निर्णय घेण्यासाठी सक्षम आहेत, अशी प्रतिक्रिया दिली. त्यानंतर आता सर्वाच्या भुवया उंचावल्या आहेत.

''समीर भुजबळ हे अपक्ष लढणार असल्याची केवळ बातमी आहे. कुणी म्हणतं की समीर भुजबळ हे मशालीवर निवडणूक लढणार, कुणी म्हणतं की तुतारीवर लढणार आहेत. मात्र, समीर भुजबळ अजून कुठेही गेलेले नाहीत. ते आज माझा उमेदवारी अर्ज भरण्यासाठी उपस्थित राहणार आहेत. ते अपक्ष लढणार की नाही, याबाबत त्यांनी मला काहीही सांगितलं नाही. मीडियाला काही सांगितलं असेल तर मला काही कल्पना नाही. पण ते आता त्यांच्या निर्णय घेण्यासाठी सक्षम आहेत'', असं छगन भुजबळ म्हणाले.

पुढे बोलताना छगन भुजबळ यांनी येवला मतदारसंघातून विजयाचा विश्वासही व्यक्त केला. ''मी १९८५ पासून विधानसभेचा सदस्य आहे. मला पुन्हा एकदा संधी मिळाली आहे. येवला मतदार संघातील अनेक प्रश्न आज मार्गी लागले आहेत. विकासकामं झाली आहेत. मी निवडणुकीत उभं राहावं ही येवला–लासलगाव मतदारसंघातील जनतेची इच्छा आहे. त्यामुळेच मी उमेदवारी अर्ज भरतो आहे. या निवडणुकीत जनता त्यांचा मतरुपी आशीर्वाद नक्कीच देईल'', असे ते म्हणाले.

# गेल्या २४ तासात ५२ कोटी रुपयांची जप्त

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात विधानसभा सार्वत्रिक निवडणूक – २०२४ साठी १५ ऑक्टोबर २०२४ पासून आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. राज्य शासनाच्या व केंद्र शासनाच्या विविध अंमलबजावणी यंत्रणांद्वारे करण्यात आलेल्या कारवाईत बेकायदा पैसे, दारू, ड्रग्ज व मौल्यवान धातू इत्यादी बाबतीत १५ ते २४ ऑक्टोबर २०२४ पर्यंत एकूण ९० कोटी ७४ लाख रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली असून त्यापैकी गेल्या २४ तासात ५२ कोटी रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली असल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली आहे. निवडणूक आचारसंहितेच्या काळात सजगपणे कार्यरत असलेल्या महाराष्ट्र राज्यातील १९ अंमलबजावणी यंत्रणांनी एका दिवसात ५२ कोटी रुपयांची मालमत्ता जप्त करण्याची कामगिरी बजावली आहे. विविध ठिकाणी पोलिस विभाग आणि इतर यंत्रणांनी उभारलेले तपासणी नाके योग्य पध्दतीने कार्यरत असल्यामुळे हे यश मिळाले आहे.

१) इन्कमटॅक्स डिपार्टमेंन्ट – ३० कोटी ९३ लाख ९२ हजार ५७३, २) रेव्हयून्यू इन्टेलिजन्स – ८ कोटी ३० लाख ८४ हजार ८७८, ३) राज्य पोलीस डिपार्टमेंट – ८ कोटी १० लाख १२ हजार ८११,४) नार्कोटिस्ट कंन्ट्रोल ब्युरो – २ कोटी ५० लाख,५) राज्य उत्पादन शुल्क विभाग – १ कोटी ७५ लाख ३९२, ६) कस्टम डिपार्टमेंट – ७२ लाख ६५ हजार ७४५

दिवसभरात झालेल्या कारवाईमध्ये नागपूर, मुंबई उपनगर, रत्नागिरी ह्या जिल्ह्यांमधल्या मोठ्या कारवायांचा समावेश आहे. ह्यातून निवडणूक यंत्रणा दक्ष असून मतदारांना प्रलोभन दाखवण्याचा प्रकार खपवून घेतला जाणार नाही, असा संदेश गेला आहे. प्रत्येक प्रकरणाच्या मागील धागेदोरे तपास काढून गुन्ह्याची साखळी मोडून काढण्याचे आदेश निवडणूक आयोगाने दिले आहेत. सर्व मतदारांना आचारसंहिता भंगाचा प्रकार आढळल्यास आयोगाच्या सी व्हिजील ॲपवर तक्रार करता येते. ह्या तक्रारींची माहिती सर्व अंमलबजावणी यंत्रणांना दिली जात असल्याने आवश्यक ठिकाणी जप्तीची कारवाई केली जात आहे.

**प्राप्तीकर विभागाचा स्वतंत्र नियंत्रण कक्ष २४ तास कार्यरत**

धनशक्तीचा वापर करुन मतदारांना प्रलोभन दाखवणाऱ्यांना लगाम घालण्यासाठी आयकर विभाग देखील पुढे सरसावला आहे. राज्यात सुरू असलेल्या विधानसभा निवडणुकांच्या काळात पैशांचा गैरवापर रोखण्याच्या उद्देशाने प्राप्तीकर विभागाने मुंबई इथे नियंत्रण कक्षाची स्थापना केली आहे. हा नियंत्रण कक्ष आठवड्याचे सातही दिवस चोवीस तास सुरु असेल.

या नियंत्रण कक्षाकडे नागरिक १८००२२१५१० हा टोल फ्री क्रमांक ८९७६१७६२७६ आणि ८९७६१७६७७६ या व्हॉट्सअप क्रमांकावर किंवा mumbai.addldit.inv7incometax.gov.in या ईमेलवर आपल्या तक्रारी नोंदवू शकतात. नागरिकांनी दिलेल्या माहितीच्या आधारावर प्राप्तीकर विभागाद्वारे जप्तीची कारवाई करण्यात येत आहे.

**सी–व्हिजिल ॲपवरील आचारसंहिता भंगाच्या ९९ टक्के तक्रारी निकाली**

१५ ते २४ ऑक्टोबर २०२४ पर्यंत राज्यभरात सी–व्हिजिल ॲपवर एकूण १ हजार १४४ तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यापैकी १ हजार १४२ तक्रारी निवडणूक आयोगाकडून निकाली काढण्यात आल्या आहेत. म्हणजे एकूण ९९ टक्के तक्रारी निकाली काढण्यात आल्या आहेत अशी माहिती, मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली आहे.

सजग नागरिकांना आचारसंहिता पालनासाठी सहकार्य करणारे सी–व्हिजिल ॲप हे कोणत्याही ॲपस्टोअरमधून डाऊनलोड करता येते. या ॲपव्दारे नागरिकांना आचारसंहिता भंगाबाबत तक्रार करता येते. तक्रार दाखल झाल्यानंतर संबंधित पथकाव्दारे चौकशी करुन योग्य ती कारवाई करण्यात येते.

# महायुतीच्या २०० च्या वर जागा सहज निवडून येतील

## केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांचा विश्वास

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/विशेष प्रतिनिधी :** महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महायुती सरकारच्या काळात शेकडो लोककल्याणकारी योजना राबवून जनसामान्यांच्या मनात घर केले आहे. केलेल्या या विकास कामाच्या बळावरच शिवसेना शिंदे गट, भाजप व राष्ट्रवादी अजित पवार गट यासह घटक पक्षाच्या महायुतीचे राज्यात तब्बल २०० च्या वर जागा येतील, असा विश्वास केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी व्यक्त केला.

मेहकर विधानसभा मतदारसंघासाठी शिवसेना शिंदे गटाचे आ. संजय रायमुलकर यांनी विधानसभा निवडणुकीसाठी दि.२४ ऑक्टोबर रोजी उमेदवारी अर्ज केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या उपस्थितीत



दाखल केला. यावेळी ते प्रसारमाध्यमांशी बोलताना बोलत होते.

यावेळी ते पुढे म्हणाले की, महायुती सरकारने जनसामान्यांसाठी अनेक योजना राबविल्या आहेत. कधी नव्हे एवढा विकास अवघ्या दोन ते अडीच वर्षात झालेला आहे. त्यामुळे महायुतीच्या २०० च्यावर जागा सहज निवडून येतील असा विश्र्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच जवळपास ९० ते ९५ टक्के जागा वाटपाचा प्रश्र्न सुटला असून अवघ्या पाच–सहा जागेचा प्रश्र्न कायम आहे. हा जागा वाटपाचा प्रश्र्न सोडवण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे दिल्ली येथे गेले आहेत. दिल्ली येथे चर्चा झाल्यानंतर सायंकाळपर्यंत सर्व जागांचा प्रश्र्न सुटून सर्व उमेदवार जाहीर होतील, असे त्यांनी सांगितले. तसेच सिंदखेडराजा मतदारसंघ हा राष्ट्रवादीचा गटाचा आहे. मात्र राष्ट्रवादी काँग्रेसचे राजेंद्र शिंगणे हे महाविकास आघाडीत गेल्यामुळे तेथील जागेचा प्रश्र्न निर्माण झालेला आहे. ती जागा शिवसेनेला मिळावी हा आमचा आग्रह आहे. मात्र ती जागा कोणालाही सुटली तरी महायुतीचे उमेदवार निवडून आणण्यासाठी आम्ही प्रचंड मेहनत घेऊ आणि जास्तीत जास्त जागांवर विजय मिळवू असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.





# काँग्रेसचे ४८ उमेदवार जाहीर

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे ४८ जाग्यावरचे उमेदवार जाहीर करण्यात आले आहेत. तसेच उर्वरित उमेदवारही लवकरच जाहीर होण्याची शक्यता सूत्राकडून मिळाली आहे.

काँग्रेसच्या वतीने जाहीर केल्यात करण्यात आलेल्या उमेदवारामध्ये अक्कलकुवा विधानसभा मतदारसंघात ॲड. के.सी.पडावी, शहादा विधानसभा मतदारसंघात राजेंद्रकुमार कृष्णराव गावित, नंदुरबार किरण दामोदर तडवी, नवापूर श्रीकृष्णकुमार सुरुपसिंग नाईक, साक्री प्रविण बापू चौरे, धुळे ग्रामीण कुणाल रोहिदास पाटील, रावेर ड. धनंजय शिरीष चौधरी, मलकापूर राजेश पंडितराव एकाडे, चिखली राहुल सिद्धिविनायक बोंद्रे, रिसोड अमित सुभाषराव झनक, धामणगाव रेल्वे वीरेंद्र वाल्मीकराव जगताप, अमरावती डॉ. सुनील देशमुख, तिवसा ड. यशोमती चंद्रकांत ठाकूर, अचलपूर अनिरुद्ध बबलूभाऊ सुभाषराव देशमुख, देवळी रणजीत प्रताप कांबळे, नागपूर दक्षिण पश्रि्चम प्रफुल्ल विनोदराव गुडधे नागपूर मध्य बंटी बाबा शेळके, नागपूर पश्रि्चम विकास पी. ठाकरे, नागपूर उत्तर डॉ. नितीन काशिनाथ राऊत, साकोली नानाभाऊ फाल्गुनराव पाटोळे, गोंदिया गोपालदास शंकरलाल अग्रवाल, राजुरा सुभाष रामचंद्रराव धोटे, ब्रह्मपुरी विजय नामदेवराव वडेट्टीवार, चिमूर सतीश मनोहरराव वारजूकर, हदगाव महादेवराव निवृत्तीराव पवार पाटील, भोकर तिरुपती बाबुराव कदम कोंडेकर, नायगाव मीनल निरंजन पाटील



कोठेगावकर, पाथरी सुरेश अंबादास वारपुरडकर, फुलंब्री विलास केशवराव अवताडे, मीरा भाईंदर सय्यद मुजफ्फर हुसेन, मालाड पश्रि्चम असलम आर शेख, चांदिवली मोहम्मद आरिफ नजीम खान,धारावी डॉ. ज्योती एकनाथ गायकवाड, मुंबादेवी अमीन अमीराअली पटेल, पुरंदर संजय चंद्रकांत जगताप, भोर संग्राम अनंतराव टोपले, कसबा पेठ रवींद्र हेमराज धनगेकर, संगमनेर विजय बाळासाहेब थोरात, शिर्डी प्रभावती जे घोगरे, लातूर ग्रामीण धीरज विलासराव देशमुख, लातूर शहर अमित विलासराव देशमुख, अक्कलकोट सिद्धाराम सतलींगआप्पा म्हेत्रे, कराड दक्षिण पृथ्वीराज चव्हाण, कोल्हापूर दक्षिण ऋतुराज संजय पाटील, हातकणंगले राजू जयवंतराव आवटे, पलूस कडेगाव डॉ. विश्र्वजीत पतंगराव कदम, जाट विक्रम सिंग बालासाहेब सावंत यांच्या नावाची आज घोषणा करण्यात आली आहे.

CMYK

## दिवाळीमुळे सर्वांच्या उत्साहाला उधाण

आपल्या देशात दिवाळी हा सण मोठ्या उत्साहात साजरा करतात. आताही देशात दिवाळीची धामधूम सुरू आहे. वेगवेगळ्या वस्तूंच्या खरेदीसाठी बाजारपेठा फुलल्या आहेत. सर्वत्र दिवाळीच्या खरेदीची धामधूम सुरू आहे. आकाश कंदील, मिठाई, फटाके, नवीन कपडे, नवीन वाहने, इलेक्ट्रॉनिक वस्तू यांच्या खरेदीसाठी दुकाने फुलून गेली आहेत. दिवाळीमुळे सर्वांच्या उत्साहाला उधाण आले आहे. दिवाळी म्हटले की फटाके, आकाशकंदील, पणत्या, नवीन कपडे, नवीन वस्तू असे जे समीकरण आहे तसेच दिवाळी म्हणजे दिवाळी अंक असेही एक समीकरण आहे. दिवाळी आली की वाचकांना वेध लागतात ते दिवाळी अंकाचे आणि वाचकांचे पाय आपसूकच दिवाळी अंकाच्या खरेदीसाठी पुस्तकांच्या दुकानाकडे वळतात. महाराष्ट्रात तर दिवाळी अंकांची परंपरा खूप पूर्वीपासून आहे. १९०९ साली पहिला दिवाळी अंक प्रसिद्ध झाला होता त्याचे नाव मनोरंजन असे होते. पहिला दिवाळी अंक प्रसिद्ध होऊन आज ११५ वर्ष झाली आहेत. आपल्या राज्यात दरवर्षी विविध विषयांवरची दर्जेदार दिवाळी अंक प्रसिद्ध होतात. महाराष्ट्रात जवळपास हजाराच्या जवळपास दिवाळी अंक प्रकाशित होतात. दिवाळी अंक म्हणजे वाचकांसाठी मेजवानीच. कला, क्रीडा, राजकारण, अर्थकारण, विनोद, साहित्य, कथा, कांदबरी, कविता, सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य, आहार, व्यंगचित्र, भविष्य अशा वेगवेगळ्या विषयांवरील दिवाळी अंक वाचणे म्हणणे पर्वणीच. अनेक वृत्तपत्रे वाचकांसाठी दिवाळी अंक काढत असतात. फटाके, मिठाई, फराळ यासमवेतच दिवाळी अंक ही सुशिक्षित आणि साहित्यप्रेमी घरांसाठी एक आवश्यक घटक आहे. कोरोना काळात दिवाळी अंकाच्या छपाईला आणि वितरणाला मर्यादा आल्या होत्या त्यामुळे तुलनेने कमी दिवाळी अंक प्रसिद्ध झाली होती. असे असले तरी काही संपादकांनी आणि प्रकाशकांनी आपले अंक ऑनलाइन प्रसिद्ध केले होते. वाचकांना ते विविध डिजिटल प्लॅटफॉर्मवर उपलब्ध झाले होते. काहींनी आपले अंक पीडीएफ स्वरूपात उपलब्ध करून दिले होते. वाचकांनी त्याची प्रिंट काढून ते वाचले होते. आता कोरोनाचे दुष्चक्र संपले असल्याने दिवाळी अंकांना पुन्हा एकदा सुगीचे दिवस आले आहेत. यावर्षी अनेक प्रकाशकांनी आपले दिवाळी अंक प्रकाशित केले आहेत. यासोबतच ऑडिओ – व्हिज्युअल दिवाळी अंकही आहे. वाचक पूर्वीच्याच उत्साहाने दिवाळी अंकाचे स्वागत करीत आहे. दिवाळी अंक आपल्या साहित्य संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे. दिवाळी अंकामुळे वाचन संस्कृती रुजायला खूप मदत झाली आहे. वाचन संस्कृती रुजवण्यात व नव्या पिढीला वाचन संस्कृतीकडे घेऊन जाण्यास दिवाळी अंकाचा मोठा वाटा आहे. यावर्षी आपण आपल्या मित्र परिवारांना, नातेवाईकांना दिवाळीच्या शुभेच्छा व फराळासोबत दर्जेदार दिवाळी अंक भेट द्यावेत. वाचनाची गोडी वाढवण्यासाठी दिवाळी अंक हा चांगला मार्ग आहे. गोडाधोडाचा फराळासोबतच वाचनाचा हा फराळही दिला तर दिवाळीची गोडी आणखी वाढेल आणि वाचन संस्कृती रुजायलाही मदत होईल.

## सत्संगला येणाऱ्या अल्पवयीन मुली गरोदर राहिल्याने खळबळ!

बुलंदशहर : महिलांविरोधातील गुन्ह्यांमध्ये सातत्यानं वाढ होत असून, उत्तर प्रदेशातून अशीच मन सुन्न करणारी बातमी समोर आली आहे. बुलंदशहर येथील स्याना पोलीस स्थानकाच्या हद्दीत येणाऱ्या राधास्वानी सत्संग व्यास परिसरात खेळण्यासाठी म्हणून येणाऱ्या दोन अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार करण्यात आल्याचं धक्कादायक वृत्त समोर आलं आहे.

सत्संगमध्ये असणाऱ्या ६५ वर्षीय सेवादारावर या मुलींवर मागील ८ महिन्यांपासून प्रसादातून नशेच्या गोड गोळ्या देण्याच्या बहाण्यानं अत्याचार केल्याचा आरोप करण्यात आला. दोन मुलींपैकी एकीच्या घरी ती चार वर्षांची गरोदर असल्याचा खुलासा होताच घरातील मंडळींच्या पायाखालची जमीन सरकली. ज्यानंतर पीडितेच्या कुटुंबीयांनी पोलिसांत तक्रार दाखल केल्यानंतर आरोपीला बेड्या ठोकण्यात आल्या. घटनाक्रम मन विषण्ण करणारा

बुलंदशहर जनपद येथील स्याना पोलीस स्थानकाच्या हद्दीत येणाऱ्या एका खेडेगावातील दोन १४ वर्षीय मुली, (साधारण ६ वी आणि ७ वीच्या विद्यार्थिनी) या दोघीही दोन वेगवेगळ्या कुटुंबातील. या मुली दररोज गावापाशी असणाऱ्या राधास्वामी सत्संग व्यास येथील परिसरात खेळण्यासाठी जात होत्या. तिथंच काम करणाऱ्या एका सेवादारानं त्या दोघींना नशेच्या गोड चवीच्या गोळ्या देत याचंच आमिष त्या मुलींना दाखवून त्यांच्यावर बलात्कार केला. जवळपास ८ महिने सेवादारानं हे दुष्कृत्य सुरूच ठेवलं होतं.

प्रकरण त्या क्षणी प्रकाशात आलं जेव्हा इयत्ता सातवीत शिकणाऱ्या मुलीच्या पोटात वेदना सुरू झाल्या. नातेवाईकांनी तिला डॉक्टरांकडे नेलं असता तिथंच ती चार महिन्यांची गरोदर असल्याची खळबळजनक बाब समोर आली.

# आचारसंहितेचे उल्लंघन होतेय ? मग, सी व्हिजिल ॲपवर तक्रार करा

## १०० मिनिटाच्या आत मिळतो प्रतिसाद

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** भारत निवडणूक आयोगाने विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीची तारीख जाहीर केली आहे. २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. त्यासाठी १५ ऑक्टोबर २०२४ पासून राज्यात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. या निवडणूक कालावधीत आचारसंहितेचे उल्लंघन होत असल्यास सर्वसामान्य मतदार, नागरिकांना आता थेट निवडणूक आयोगाकडे तक्रार करता येणार आहे. त्यासाठी भारत निवडणूक आयोगाने सी व्हिजिल सिटीझन ॲप विकसित केले आहे. या पवर दाखल होणाऱ्या तक्रारींवर १०० मिनिटांत पहिली कार्यवाही केली जात आहे.




आचारसंहिता कालावधीत काय करावे आणि काय करु नये याविषयी निवडणूक उमेदवार, प्रशासन आणि राजकीय पक्षांना माहिती दिली जाते. पण, काहीवेळा आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन होते. त्याची तक्रार करणे आता पूर्वीपेक्षा अधिक सुलभ झाले आहे. आचारसंहिता उल्लंघनाची तक्रार किंवा माहिती निवडणूक आयोग आणि जिल्हा प्रशासनापर्यंत पोहोचवण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने सी व्हिजिल ॲप विकसित केले आहे. या मोबाईल ॲपद्वारे मतदारांना आता थेट आयोगाकडे तक्रार करता येणार आहे. या सी व्हिजिल ॲपवर तक्रार प्राप्त होताच तातडीने त्यावर कारवाई केली जाते. तक्रारदाराचे नाव गोपनीय ठेवले जाते.

सी व्हिजिल ॲप अँड्रॉइड आणि आयओएस डिव्हाइसवर डाऊनलोड करण्यासाठी उपलब्ध आहे. उल्लंघनाची तक्रार करण्यासाठी, वापरकर्त्यांनी फक्त ॲप उघडणे, उल्लंघनाचा प्रकार निवडणे आणि घटनेचे तपशिल, स्थान, वेळ आणि छायाचित्रे किंवा व्हीडिओ प्रदान करणे आवश्यक आहे. ॲप वापरकर्त्यांना त्यांच्या तक्रारींच्या प्रगतीचा मागोवा घेता येणार आहे.

सी व्हिजिल ॲप हा वापरकर्त्यांना आदर्श आचारसंहितेच्या उल्लंघनाची तक्रार करण्याची अनुमती देतो. नागरिकांना निवडणूक प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देतो. उल्लंघनाचे स्थान ट्रॅक करण्यासाठी जीपीएस वापरतो. वापरकर्त्यांना केवळ थेट घटना चित्रित करण्याची अनुमती देतो. तक्रारीच्या प्रगतीचा मागोवा घेतो. एन्ड्रॉईड मोबाईलमधील गुगल प्ले स्टोर आणि आयफोनमधील ॲप स्टोर या ॲपमध्ये जावून सी व्हिजिल सर्च करावे.त्यानंतर ॲप डाऊनलोड करा. त्यानंतर ॲप उघडून मोबाईल क्रमांक, पत्ता, मतदारसंघ समाविष्ट करून खाते तयार करा. तुम्हाला ज्या उल्लंघनाची तक्रार करायची आहे ते निवडा आणि स्थळ, वेळ आणि छायाचित्रे किंवा व्हीडिओंसह घटनेचे तपशील टाका. त्यानंतर तक्रार सबमिट करा.

या ॲप्लिकेशनचा वापर करून, निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात न जाताही काही मिनिटांतच नागरिक राजकीय गैरव्यवहाराच्या घटनांची तक्रार नोंदवू शकतात. हा सी व्हिजिल ॲप जिल्हा नियंत्रण कक्ष, निवडणूक निर्णय अधिकारी आणि भरारी पथकाशी जागरूक नागरिकांना जोडतो. ज्यामुळे एक जलद आणि अचूक कृती, देखरेख आणि अहवाल प्रणाली तयार होते.

या ॲपच्या अचूकतेसाठी ॲपमधून फक्त लाईव्ह लोकेशनवर आधारित फोटो, व्हीडिओ घेतले जातात. जेणेकरून भरारी पथक, स्थिर संनिरीक्षण चमुंना वेळेत कार्यवाही करणे शक्य होईल. या ॲपवर तक्रार दाखल होताच स्थानिक निवडणूक यंत्रणा तुमच्या तक्रारीची चौकशी करेल आणि योग्य ती कारवाई करेल. या ॲपवरील डाटा हा सुरक्षित ठेवला जातो. हा डाटा इतर कोणत्याही थर्ड पार्टीला दिला जात नाही. याशिवाय हा डाटा एन्ड टू एन्ड इन्क्रिप्टेड ठेवला जातो.

# जपानच्या वाणिज्यदूतांनी घेतली राज्यपालांची भेट

- जपान आणि भारत स्वाभाविक भागीदार : यागी कोजी
- जपानने महाराष्ट्राला मशरूम, आंबा उत्पादनात मदत करावी : राज्यपाल

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** जपान व भारत हे एकमेकांचे स्वाभाविक भागीदार असून उभय देशांचे संबंध आज सर्वोच्च पातळीवर आहेत. जपानचे महाराष्ट्राशी संबंध विशेष चांगले असून जपान महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठासोबत कौशल्य प्रशिक्षणासाठी सहकार्य करीत आहे, असे प्रतिपादन जपानचे मुंबईतील वाणिज्यदूत यागी कोजी यांनी येथे केले.

यागी कोजी यांनी गुरुवारी (दि. २४) राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांची राजभवन मुंबई येथे सदिच्छा भेट घेतली, त्यावेळी ते बोलत होते.

जपानने राज्यातील अटल सेतू, बुलेट ट्रेन, मेट्रो लाईन यांसह अनेक पायाभूत सुविधा प्रकल्पांना अर्थसहाय्य केले आहे असे सांगून सध्या जपान ५०० किमी प्रतितास चालणाऱ्या लिनिअर मोटार कार रेल्वेवर काम करीत असल्याचे त्यांनी सांगितले.



महाराष्ट्रातील १४ उच्च शिक्षण संस्थांमध्ये जपानी भाषा शिकवली जात असल्याचे यागी कोजी यांनी यावेळी राज्यपालांना सांगितले.

आपण कॉयर बोर्डचे अध्यक्ष असताना टोकियो व ओसाका येथे भेट दिली होती. जपानमधील मशरूम आकाराने मोठे, चवदार व उत्कृष्ट दर्जाचे असून जपानने राज्यातील शेतकऱ्यांना तसेच महिला बचत गटांना मशरुम उत्पादनात मदत करावी अशी अपेक्षा राज्यपाल राधाकृष्णन यांनी यावेळी व्यक्त केली. या संदर्भात उभय देशातील कृषी विद्यापीठांमध्ये सहकार्य स्थापित व्हावे असे त्यांनी सांगितले.

जपानमधील प्रसिद्ध 'मियाझाकी' आंबा अतिशय चवदार असून त्याला जगभरात सर्वाधिक बाजारमूल्य मिळते असे सांगून या आंब्याची लागवड महाराष्ट्रात करण्यासाठी देखील जपानने राज्याला मदत करावी जेणेकरून त्याचा लाभ राज्यातील शेतकरी बांधवांना होईल असे राज्यपालांनी सांगितले.

पायाभूत सुविधांप्रमाणे जपानने कृषी क्षेत्रात राज्याला मदत केल्यास त्याचा राज्यातील व विशेषतः आदिवासी भागातील शेतकऱ्यांना लाभ होईल असे राज्यपालांनी सांगितले.

विद्यापीठांचा कुलपती या नात्याने आपण राज्यातील विद्यापीठांमधून जपानी भाषेच्या अध्यापनाला चालना देऊ व त्या दृष्टीने जपान फाउंडेशनच्या पदाधिकाऱ्यांची व राज्यातील विद्यापीठांच्या कुलगुरुंची बैठक राजभवन येथे आयोजित करू असे राज्यपालांनी यागी कोजी यांना सांगितले.

जर्मनीप्रमाणे जपानने देखील महाराष्ट्रासोबत कुशल मनुष्यबळ निर्मितीसाठी योजना राबवावी तसेच सौर ऊर्जा निर्मितीसाठी मदत करावी अशी अपेक्षा राज्यपालांनी यावेळी व्यक्त केली.

## रणांगणात उतरले पण चक्रव्यूहमध्ये अडकणार? आदित्यचे दोन्ही भाऊ डेंजर झोनमध्ये!

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** विधानसभेच्या निवडणुकीची घोषणा झाल्यानंतर आता राजकीय घडामोडींना वेग आला आहे. महायुती, महाविकास आघाडीशिवाय इतर पक्षांनी देखील आपले उमेदवार जाहीर केले आहेत. यंदाची निवडणूक चुरशीची होणार असल्याचा अंदाज आहे. काही ठिकाणच्या लढती या लक्षवेधी ठरणार आहेत. यंदा आदित्य ठाकरे आणि त्यांचे दोन भाऊ निवडणुकीच्या रणांगणात उतरले आहेत. मात्र हे दोन्ही भाऊ मैदान गाजवणार की विरोधकांच्या चक्रव्यूहमध्ये अडकणार हे निकालाच्या दिवशी समजणार आहे.

आदित्य ठाकरे यांनी २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत वरळी विधानसभेतून निवडणूक लढवली आणि विजयी झाले. त्यावेळी आदित्य ठाकरे यांच्यासाठी काही जमेच्या बाजू होत्या. त्यावेळी शिवसेना–भाजप सत्तेत होती. त्याशिवाय, स्थानिक पातळीवरील समीकरणे शिवसेनेने आपल्या बाजूने वळवली. स्थानिक मातब्बर नेते, माजी मंत्री सचिन अहिर यांना शिवसेनेत सामील करून घेतले होते. त्यामुळे आदित्य यांच्यासमोर फार मोठं आव्हान नव्हते. मात्र, यंदाच्या निवडणुकीत आदित्य ठाकरे यांचा चुलत भाऊ अमित ठाकरे आणि मावस भाऊ वरुण सरदेसाई निवडणुकीच्या रिंगणात आहेत. पहिल्यांदाच दोघेही निवडणूक लढवत असून त्यांच्यासमोर मोठी आव्हाने आहेत.

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचे सुपुत्र आणि मनसे नेते अमित ठाकरे हे दादर–माहीम मतदारसंघातून निवडणूक लढवणार आहेत. अमित ठाकरे यांच्यासमोर शिवसेना शिंदे गटाचे विद्यमान आमदार सदा सरवणकर आणि शिवसेना ठाकरे गटाचे उमेदवार महेश सावंत यांचे तगडे आव्हान आहे.

दादर–माहीम या विधानसभा क्षेत्रात मनसेचा मतदार आहे. मात्र, पूर्वीप्रमाणे तो मनसेच्या पाठीशी कितपत उभा राहिल यावर प्रश्न आहे. तर, दुसरीकडे सदा सरवणकर यांनी शिवसैनिक, नगरसेवक ते आमदार असा प्रवास केल्याने त्यांना या मतदारसंघाची व्यवस्थित माहिती आहे. त्यांच्या परिचयातील हा मतदारसंघ असल्याने त्यांना यातील सकारात्मक गोष्टी आपल्याकडे वळवता येणे शक्य आहे. शिवसेना सोडून काँग्रेसमधून उभे राहिल्यानंतरही सदा सरवणकर यांना दुसऱ्या क्रमांकाची मते मिळाली होती.

शिवसेना ठाकरे गटाकडून महेश सावंत हे उमेदवार आहेत. शिवसेनेत फूट पडल्यानंतर शिंदे गटात असलेल्या सदा सरवणकर यांच्याकडून मतदारसंघ आपल्याकडे खेचण्यासाठी महेश सावंत प्रयत्नशील असणार आहेत. महेश सावंत हे ठाकरे गटाचे विभागप्रमुख आहेत. प्रभादेवी–दादर–माहीम हा भाग शिवसेनेचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो. शिवसेनेतील फुटीनंतर आता ठाकरे गट हा मतदारसंघ जिंकण्यासाठी प्रयत्नशील असणार आहेत. या सगळ्या पार्श्वभूमीवर अमित ठाकरे यांना विजय मिळवण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागणार आहे.

## बाबा सिद्दीकी हत्या प्रकरण : कट रचणारा व शूटर्समधील दुवा पोलिसांच्या हाती, हरियाणातून एकाला अटक

**मुंबई/प्रतिनिधी :** माजी मंत्री बाबा सिद्दीकी यांच्यावरील गोळीबारात आणि हत्येच्या कटात सहभागी अनुक्रमे सहभागी गुरमैल सिंह व मोहम्मद झिशार अख्तर यांच्यातील दुवा पोलिसांच्या हाती लागला आहे. सिद्दीकी यांच्या हत्येच्या कटात सहभागी असल्याप्रकरणी अमित हिसामसिंह कुमार (२९) याला बुधवारी गुन्हे शाखेने अटक केली. त्याला न्यायालयापुढे हजर करण्यात आले असून न्यायायलयाने त्याला पोलीस कोठडी सुनवली आहे. ही याप्रकरणातील ११ वी अटक आहे.

अमित कुमार हा हरियाणातील कैठाल तालुक्यातील नाथवान पट्टी येथील रहिवासी आहे. सिद्दीकी यांच्या हत्येचा कट रचणारा मोहम्मद झिशान अख्तर याच्या संपर्कात अमित कुमार होता. अख्तरच्या सांगण्यावरून त्याने गुरमैलला बाबा सिद्दीकी यांच्या हत्येत सहभागी होण्यास सांगितले होते. त्यासाठी त्याच्यापर्यंत काही रक्कमही पोहोचली असून त्याची तपासणी सुरू असल्याचे अधिकाऱ्याने सांगितले.

# म्हाडाच्या लॉटरीत पराभूत तरी मिळणार मुंबईत घर! ४४२ जणांचं नशीब फळफळलं

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र गृहनिर्माण क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा)ने मुंबई मंडळासाठी २०३० घरांची लॉटरी काढली होती. या लॉटरीमुळं अनेक मुंबईकरांचे घराचे स्वप्न पूर्ण झाले आहे. ज्या अर्जदारांचे म्हाडाच्या सोडतीत नाव आलं नाही त्या ४४२ जणांनाही म्हाडाचे घर लागले आहे. मुंबई मंडळाच्या ४४२ लॉटरी विजेत्यांनी




म्हाडाला घर परत केले आहेत. विजेत्यांनी घर परत करण्याचा निर्णय घेतल्याने वेटिंग लिस्टमध्ये असलेल्या उमेदवारांनी घराची लॉटरी लागली आहे.

म्हाडाच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, विजेत्यांनी घर म्हाडाला परत केल्यानंतर वेटिंग लिस्टमध्ये असलेल्या अर्जदारांना एसएमएसच्या माध्यमातून माहिती देण्यात येईल. त्यानंतर वेटिंग लिस्टमध्ये असलेल्या अर्जदारांना घर विकत घेण्याची संधी मिळेल. म्हाडाने लॉटरी विजेत्यांना २० ऑक्टोबरपर्यंत घरं स्विकारण्याची मुदत दिली होती.

मुंबई मंडळाने २०३० घरांसाठी ८ ऑक्टोबर रोजी सोडत जारी केली होती. २०३० घरांसाठी १,१३,८११ जणांनी अर्ज दाखल केला आहे. अनेक लॉटरी विक्रेत्याने एकाहून अधिक घर लागली आहेत. मात्र, नियमांनुसार विजेता एकाहून अधिक घर खरेदी करु शकत नाही. यामुळं या लॉटरीच्या माध्यमातून विजेत्यांना एका पेक्षा अधिक घर स्वीकारता येत नाही. एक घर सरेंडर करावे लागते.

मुंबईत घरांच्या किंमतीत मोठी वाढ झाली आहे. सर्वसामान्यांना परवडतील अशी घर घेण्यासाठी म्हाडाच्या लॉटरीची वाट पाहावी लागते. मात्र तरीही काही जण या घरांसाठी किंमतीची जुळवाजुळव करु शकत नाहीत. त्यामुळं अनेकांनी घरं परत केली आहेत. तर, काहींना बँकेतून कर्ज न मिळाल्याने घरं परत केली आहेत. २०२३मध्ये ३३३ लॉटरी विजेत्यांनी म्हाडाची घरे परत केली आहेत. त्यामुळं ही घरे म्हाडाने २०२४च्या लॉटरीत समाविष्ट केली आहेत.

२०२४च्या लॉटरी प्रक्रियेत सुरुवातीला म्हाडाला कमी प्रतिसाद मिळाला होता. त्यानंतर म्हाडाने खासगी बिल्डरांकडून ३७० घरांच्या किंमती १५ ते २५ टक्क्यांपर्यत कमी करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयानंतर अर्जदारांच्या संख्येत मोठी वाढ झाली होती.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### महाविकास आघाडी करून बारामतीत युगेंद्र पवारांना उमेदवारी जाहीर





दैनिक आपला विदर्भ

**बारामती/प्रतिनिधी** : बारामतीत महाविकास आघाडीकडून राष्ट्रवादी काँग्रेस शरद चंद्र पवार पक्षाच्या वतीने युगेंद्र श्रीनिवास पवार यांना उमेदवारी देण्यात आली आहे यामुळे बारामतीत पुन्हा काका विरुद्ध पुतण्या असा सामना रंगणार आहे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विरोधात त्यांची सख्खे पुतणे युगेंद्र पवार यांच्यामध्ये ही विधानसभेची निवडणूक रंगणार आहे.

उमेदवारी मिळाल्याबद्दल मनापासून आनंद होत असल्याचे सांगत पक्षाचे अध्यक्ष शरद पवार खासदार सुप्रिया सुळे यांनी माझ्यावरती आत्मविश्र्वास ठेवला मनापासून आभार मानतो. यापुढे बारामतीच्या जनतेसाठी आणि सर्वसामान्यांसाठी लोकप्रतिनिधी म्हणून काम करील त्यांचे प्रश्र्न सोडवण्यासाठी १००% प्रयत्न करीन. महागाई भ्रष्टाचार पाण्याचा प्रश्र्न शेतकऱ्यांच्या पिकाला हमीभाव बेरोजगारी वाड्या वस्तूंवरील पाण्याचा प्रश्र्न रस्त्याचा प्रश्र्न वैयक्तिक प्रश्र्न ही कामे मार्गे लावण्यासाठी प्रयत्न करणार. दोन-तीन दिवसांनी शरद पवार यांच्याशी चर्चा करून पक्षाशी बोलणे झाल्यावर सर्वांना विश्र्वासात घेऊन उमेदवारी अर्ज दाखल भरण्याची तारीख ठरेल. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या सारख्या अनुभवी उमेदवाराच्या समोर तुम्ही पहिल्यांदा निवडणुकीला सामोरे जात आहात यावर प्रत्येकजण पहिल्यांदा निवडणूक लढत असतो. शरद पवारांना जो त्रास झाला याची आम्हाला जाणीव आहे आम्ही कोणाला विरोध करायला नाहीतर शरद पवार आजोबांना साथ देण्यासाठी उभा राहिलो आहे आणि काम करायला शिकलो. असेही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बारामती विधानसभेचे उमेदवार युगेंद्र पवार यांनी प्रतिक्रिया दिली

### मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी स्वत: चालवली गाडी, उमेदवारांना बसवले बाजूला





दैनिक आपला विदर्भ

**कल्याण/प्रतिनिधी** : कल्याण ग्रामीणचे मनसे उमेदवार राजू पाटील यांनी आज आपला उमेदवारी अर्ज डोंबिवलीतील सावळाराम क्रीडा संकुल निवडणूक कार्यालयात दाखल केला. यावेळी मनसे प्रमुख राज ठाकरे ठाण्याचे मनसे उमेदवार अविनाश जाधव, राजू पाटील यांच्या कुटुंबीय उपस्थित होते. यावेळी राज ठाकरे यांनी स्वतः आपली गाडी चालवत कल्याण ग्रामीणचे उमेदवार राजू पाटील आणि ठाण्याचे उमेदवार अविनाश जाधव यांना आपला गाडीत बसवून मुंबईच्या दिशेने रवाना झाले.

### चोपड्यात एक लाख ८७ हजार रुपयांच्या पान मसाला सुगंधित तंबाखू जप्त पोलिसांची कारवाई



दैनिक आपला विदर्भ

**जळगाव/प्रतिनिधी** :चोपडा शहरातील जुना यावल रस्त्या लघत असलेल्या केजीएन कॉलनी परिसरात घराच्या कंपाऊंड च्या आत शरीराला हानिकारक असलेल्या व महाराष्ट्रात बंदी असलेले पान मसाला सुगंधित तंबाखू जर्दा स्वतःच्या फायदा च्या उद्देशाने विक्री करण्यासाठी साठा मिळून आल्याने चोपडा शहर पोलीस स्टेशनच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कारवाई करून एक लाख ८७ हजार ३८० रुपयाच्या मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे चोपडा शहर पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# निवडणूक खर्च निरिक्षक बुलढाण्यात दाखल ; खर्चविषयक बाबींचा घेतला आढावा

## प्रशासकीय यंत्रणांनी सज्ज राहावे : निरिक्षक दानिश अब्दुल्ला, नवनीत कुमार

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : जिल्ह्यातील सातही मतदारसंघात निवडणुकीदरम्यान उमेदवारांच्या खर्चाच्या बाबींवर लक्ष्य ठेवण्यासाठी निवडणूक खर्च निरिक्षक म्हणून भारतीय महसूल सेवेतील अधिकारी दानिश अब्दुल्ला आणि नवनीत कुमार यांची नियुक्ती करण्यात आली आहे. निवडणूक खर्च निरिक्षक बुलढाण्यात दाखल झाले असून त्यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयात निवडणूक खर्च विषयक बाबींचा आढावा घेतला.

बैठकीला जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ.किरण पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक विश्र्व पानसरे, अपर जिल्हाधिकारी सदाशिव शेलार, उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुहासिनी गोणेवार, अपर पोलीस अधीक्षक बी.बी. महामुनी, उपजिल्हाधिकारी जयश्री ठाकरे, निवडणूक खर्च विषयक बाबींचे नोडल अधिकारी प्रकाश राठोड, विविध विभागाचे प्रमुख व नोडल अधिकारी, सर्व खर्च निरिक्षक उपस्थित होते.

निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्हा प्रशासनाच्या तयारीची माहिती निरिक्षकांनी घेतली. यामध्ये त्यांनी मतदारसंघ, मतदान केंद्रांची संख्या व त्याठिकाणावरील सुविधा, मतदार संख्या, भरारी पथक, स्थिर नियंत्रण पथक, कंट्रोल रुम, वेबकास्टींग सुविधा, ईव्हीएम व व्हीव्हीपॅट, मनुष्यबळ व प्रशिक्षण, कायदा व सुव्यवस्था, प्रतिबंधात्मक कारवाई, ई-एसएमएस सेवा आदी बाबींविषय माहिती घेतली. निवडणूक काळात उमेदवार व पक्षाच्या खर्चाच्या सर्व नोंदी व्यवस्थितपणे घेण्याचे निर्देश त्यांनी दिले. उमेदवारांच्या सभा, प्रचार वाहने, प्रचार साहित्य, भोजन, जाहिरातींवर होणाऱ्या खर्चाची नोंद ठेवावी. निवडणुकीदरम्यान तपासणी नाक्यांवर पथकांनी काटेकोरपणे काम करावे. रोख रक्कम आढळल्यास निवडणूक आयोगाच्या सूचनेप्रमाणे रक्कम जप्त करणे व पुढील कारवाई करण्यात यावी, अशा सूचना निवडणूक खर्च निरिक्षकांनी केल्या.

खर्चविषयक बाबींवर लक्ष ठेवण्यासाठी तयार करण्यात आलेल्या खर्च तपासणी पथक, व्हिडीओ तपासणी पथकांनी या दरम्यान काळजीपूर्वक काम करावे. या पथकातील सदस्यांना काही अडचणी असल्यास त्या समन्वयाने निकाली काढल्या पाहिजे, अशाही सूचना त्यांनी दिल्या.

### सर्व मतदारसंघातील यंत्रणांवर बारकाईने लक्ष : जिल्हाधिकारी

यावेळी जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी जिल्हा प्रशासनाच्या तयारीची सविस्तर माहिती सादरीकरणाद्वारे दिली. जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदारसंघातील प्रशासकीय यंत्रणेवर बारकाईने लक्ष्य ठेवले जात आहे. तसेच प्रशासनाने समन्वयाने जबाबदारी पार पाडण्याच्या सूचना देखील त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीकोणातून पोलीस प्रशासन करीत असलेल्या कारवाईची माहिती पोलीस अधीक्षक विश्व पानसरे यांनी दिली.

---

## अभिषेक आणि ऐश्वर्या यांच्या घटस्फोटाच्या अफवांदरम्यान 'बिग बीं'ची पोस्ट चर्चेत

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** :अभिषेक बच्चन आणि ऐश्वर्या राय यांच्या घटस्फोटाच्या बातमी सोशल मीडियावर चांगलाच धुमाकूळ घातला आहे. अभिषेक बच्चन आणि ऐश्वर्या राय यांच्या विभक्त होण्याच्या बातम्यांना रोजचं वेगवेगळ वळण मिळत आहे. सध्या या बातम्यांवर स्टार कपलकडून कोणतीही प्रतिक्रिया आलेली नाही. दरम्यान, अमिताभ बच्चन यांनी आपल्या एका पोस्टनं लोकांना विचार करायला भाग पाडलं आहे. या पोस्टमध्ये अमिताभ बच्चन यांनी स्वत:चा एक फोटोही शेअर केला आहे. मुलगा अभिषेक आणि सून ऐश्वर्या राय यांच्या विभक्त झाल्याच्या बातम्यांदरम्यान अमिताभ बच्चन यांची पोस्ट सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे.

अमिताभ बच्चन यांची पोस्ट : अमिताभ बच्चन यांनी काल रात्री केबीसी १६च्या सेटवरील स्वत:चा एक फोटो त्यांच्या इंस्टाग्राम अकाउंटवर शेअर करत कॅप्शनमध्ये लिहिलं, 'कर भाऊ, कितीही प्रयत्न केले तरी आता चेहऱ्याला काही होणार नाही!' या पोस्टवर अमिताभ बच्चन चाहते आपल्या भरभरून प्रतिक्रिया देत आहेत. अमिताभ यांचा फोटो अनेकांना पसंत पडत आहे. अमिताभ बच्चन यांच्या या पोस्टवर अनेक चाहत्यांनी लाईक बटण दाबले आहेत. एका चाहत्यानं यावर लिहिलं आहे की, 'तुम्ही लोकांना असेच प्रेरणा देत राहा.' दुसरा चाहता लिहिलं, 'तुम्ही सर्वोत्तम आहात'. आणखी एका चाहत्यानं लिहिलं, 'सर तुम्ही सुपरस्टार आहात.'

अमिताभ बच्चन यांची ही पोस्ट अशावेळी आली आहे, जेव्हा अभिषेक आणि ऐश्वर्याच्या घटस्फोटच्या बातम्या सोशल मीडियावर वेगानं पसरत आहे. अभिषेक आणि ऐश्वर्या राय यांच्या विभक्त होण्याच्या अफवा दिवसेंदिवस वाढत आहेत. आता अभिषेक आणि ऐश्वर्यामधील या प्रकरणात अभिनेत्री निम्रत कौरचं नाव देखील समोर आलं आहे, यामुळे या जोडप्याच्या विभक्त होण्याच्या अफवा या आणखी जोर धरत आहेत.

दरम्यान अभिषेक बच्चन आणि ऐश्वर्या राय बच्चन यांच्यात घरगुती वाद असल्याचं सांगितलं जात आहे. अभिषेक बच्चनची बहीण श्वेता बच्चनमुळे घरात वाद वाढत असल्याचं कारण यापूर्वी समोर आलं होतं.

## बॅलेट युनिट, कंट्रोल युनिट व ईव्हीएम मशिन्सची प्रथम सरमिसळ पूर्ण

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** विधानसभा निवडणुकीसाठी पुरेशा संख्येने ईव्हीएम मशिन उपलब्ध आहे. सर्व बॅलेट युनिट, कंट्रोल युनिट व ईव्हीएम मशिन्सची प्रथम सरमिसळ १८ ते २१ ऑक्टोबर, २०२४ या कालावधीत सर्व जिल्ह्यांकडून पूर्ण करण्यात आली असल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयामार्फत कळविण्यात आली आहे.

महाराष्ट्र विधानसभा २०२४ च्या निवडणुकीच्या अनुषंगाने १ लाख १८६ इतक्या मतदान केंद्रासाठी २ लाख २१ हजार ६०० बॅलेट युनिट (२२१ % ) १ लाख २१ हजार ८८६ कंट्रोल युनिट (१२२%) व १ लाख ३२ हजार ९४ व्हीव्हीपॅट (१३२%) इतक्या प्रथमस्तरीय तपासणी मशिन्स उपलब्ध असून एकूण प्रथमस्तरीय करण्यात आलेल्या ईव्हीएम मशिन्स पैकी प्रशिक्षण व जनजागृतीच्या कार्यक्रमाकरिता त्यापैकी ५ हजार १६६ बॅलेट युनिट, ५ हजार १६६ कंट्रोल युनिट व ५ हजार १६५ व्हीव्हीपॅट इतक्या ईव्हीएम मशिन्सचा वापर करण्यात आला आहे.

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ दरम्यान मुंबई उच्च न्यायालय, व विविध खंडपीठासमोर १४ लोकसभा मतदारसंघात १६ निवडणूक याचिका दाखल करण्यात आलेल्या आहेत. सदरहू १६ याचिकांमुळे राज्यातील विविध जिल्ह्यात ५६ हजार २०० बीयु व २८ हजार ४०८ सीयु मशीन्स न्यायालयीन प्रकरणामुळे सीलबंद होत्या. सद्यस्थितीत प्रस्तुत १६ निवडणूक याचिकांपैकी ७ निवडणूक याचिकांमधील ईव्हीएम-व्हीव्हीपॅट मशीन्स उच्च न्यायालयाने मुक्त केल्या आहेत. त्यामध्ये २३ हजार ७३१ बीयु व १२ हजार ३०७ सीयु मशीन्सचा समावेश आहे.

## काँग्रेसच्या पारंपरिक मतदारसंघात ठाकरेंचा उमेदवार, झीशान सिद्दीकी अडचणीत?

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** आगामी विधानसभा निवडणुकांसाठी राज्यात घडामोडींना वेग आला आहे. भाजप, मनसे, शिवसेना आणि राष्ट्रवादीने पहिली यादी जाहीर केली आहे. उद्धव ठाकरेंच्या शिवसेना पक्षानेही पहिली यादी जाहीर केली आहे. विधानसभा निवडणुकांसाठी एकूण ६५ जणांना पक्षाकडून संधी देण्यात आली आहे. तसंच, अनेक नवीन चेहरेही शिवसेनेने रिंगणात उतरवले आहेत. वरुण सरदेसाई पहिल्यांदा निवडणुकीसाठी मैदानात उतरले आहेत, तर, ठाण्यातून केदार दिघे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. उद्धव ठाकरेंच्या शिवसेना पक्षाने वांद्रे पूर्व मतदारसंघातून वरुण सरदेसाई यांना तिकिट दिलं आहे. २०१९ साली या मतदारसंघातून काँग्रेसने झीशान सिद्दीकी यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवले होते. मात्र, विधानसभा निवडणुकीपूर्वीच झीशान सिद्दीकी यांनी अजित पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केला होता. त्यामुळं राष्ट्रवादीकडून झीशान सिद्दीकी यांना उमेदवारी मिळण्याची शक्यता आहे. वांद्रे पूर्व मतदारसंघात आता वरुण सरदेसाई आणि झीशान सिद्दीकी यांच्यात लढत होणार असं चित्र आहे. दरम्यान, वांद्रे पूर्व मतदारसंघ ही काँग्रेसची जागा असूनही ठाकरेंनी वरुण सरदेसाई यांना उमेदवारी जाहीर केली त्यावरुन अनेक तर्कवितर्क लढवण्यात येत होते. तसंच, चांदीवलीची जागा ही शिवसेनेची असूनदेखील त्यांनी तिथे उमेदवार जाहीर केलेला नाही. चांदिवली येथून काँग्रेसचे नसीम खान निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक आहेत. त्यामुळं काँग्रेस आणि ठाकरेंनी या दोन्ही जागा स्वाईप केल्या आहेत, अशी माहिती सूत्रांकडून समजतेय.

वांद्रे पूर्व येथून उद्धव ठाकरेंच्या शिवसेना पक्षाकडून वरूण सरदेसाई तर चांदीवली येथून नसीम खान हे निवडणूक लढवतील, अशी चर्चा आहे. दरम्यान, ठाकरे गटाने वांद्रे पूर्व मतदारसंघातून वरून सरदेसाई यांची उमेदवारी जाहीर केल्यानंतर काँग्रेसचे विद्यमान आमदार झीशान सिद्दिकी यांनी ट्विट केले आहे. असं ऐकलंय की, जुन्या मित्रांनी वांद्रे पूर्वमधून उमेदवाराची घोषणा केली आहे. साथ निभावणं तर कधी त्यांच्या स्वभावात नव्हतंच, आता जनता निर्णय घेईल, असं झीशान सिद्दीकी यांनी ट्विट करत म्हटलं आहे. तसंच, त्यांनी एक शेरदेखील ट्विट केला आहे.

## डिंपल कपाडियानं मुलगी ट्विंकल खन्नाबरोबर फोटो काढण्यासाठी दिला नकार, व्हिडिओ व्हायरल

**मुंबई/प्रतिनिधी :** दिग्गज अभिनेत्री डिंपल कपाडिया आणि ट्विंकल खन्ना यांच्यातील बाँडिंग अनेकदा सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये पाहायला मिळते. अक्षय कुमार पत्नी ट्विंकल खन्नाबरोबर २३ ऑक्टोबर रोजी मुंबईतील एका चित्रपटाच्या स्क्रीनिंगसाठी पोहोचला होता.

यात त्याची सासू ट्विंकलची आई डिंपल कपाडियाही कार्यक्रमात सहभागी झाली होती. यावेळी डिंपलला पापाराझींनी ट्विंकलबरोबर फोटोसाठी पोझ द्यायला लावली. यानंतर तिनं यासाठी स्पष्ट नकार दिला. यावेळी तिनं म्हटलं, ''मी ज्युनियरबरोबर पोझ देत नाही, फक्त सीनियर्सबरोबर देते.'' आता तिचा हा व्हिडिओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला आहे.

# नाशिकमध्ये बंडखोर उमेदवारांवर मनसेची नजर; राज ठाकरेंची नेमकी रणनीती काय?

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी** : विधानसभा निवडणुका जाहीर होताच तयारीतच असलेले प्रमुख राजकीय पक्षांची लगबग सुरू झालीय. घोषणा, प्रतिघोषणा, आव्हाने, प्रतिआव्हाने यामुळे राजकीय वातावरण चांगलंच तापलंय. लोकसभा निवडणुकीत भाजपाला पाठिंबा देणारे मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी काही दिवसांपूर्वीच राज्यातील सर्व जागा लढविण्याचे स्पष्ट संकेत देत मरगळलेल्या मनसैनिकांमध्ये प्राण फुंकण्याचा प्रयत्न केला होता. त्यामुळे राजकीय वर्तुळात राज ठाकरे यांच्या भूमिकेबद्दल उत्सुकता होती. परंतु महायुती आणि महविकास आघाडीतील अर्ध्याहून अधिक उमेदवार जाहीर होऊनही मनसेच्या राजगडावर अजून शांतता आहे.

मनसे वेट अँड वॉचच्या भूमिकेत: नाशिक जिल्ह्यातील मनसेची स्थिती संभ्रमावस्थेत आहे. नाशिक शहरातील चारही मतदारसंघांतील उमेदवारांची नावे जवळपास स्पष्ट झाली असून, मनसे वेट अँड वॉचच्या भूमिकेत आहे.



दरम्यान, प्रबळ उमेदवारच मनसेला मिळेना अशी परिस्थिती स्थानिक पदाधिकाऱ्यांसमोर उभी राहिलीय. त्यापेक्षा आयता उमेदवार उभा करण्याकडे मनसेचा कल आहे. म्हणजे तिकीट न मिळालेल्या बंडखोरास आपल्या पक्षात घेऊन त्याला बोहल्यावर उभा करण्यासाठी आता धडपड सुरू आहे. वारंवार आपली भूमिका बदलती ठेवून कार्यकर्त्यांचा अंत पाहणाऱ्या राज ठाकरेच्या पक्षाला आता घरघर लागलीय. एकेकाळी तीन-तीन आमदार देणाऱ्या नाशिक शहरात मनसेला उमेदवार मिळू नये ही मोठी शोकांतिका आहे.

नाशिक पश्चिम मतदारसंघात विद्यमान आमदार सीमा हिरे यांना पुन्हा भाजपाकडून उमेदवारी जाहीर झाल्यानंतर भाजपातील अनेक पदाधिकाऱ्यांनी बंड पुकारलाय, यातील नगरसेवक दिनकर पाटील आणि शशिकांत जाधव हे बंडखोरी करण्याच्या तयारीत असून, त्यांना मनसेकडून विचारणा झालीय, नाशिक पूर्व मतदारसंघात भाजपाकडून राहुल आहेर यांना पुन्हा उमेदवारी दिल्याने येथील इच्छुक असलेले उद्धव निमसे काहीसे नाराज झाले असून, त्यांनीदेखील बंडखोरी करत अपक्ष उमेदवारी करण्यासाठी चाचपणी केलीय, त्यांनाही मनसेकडून विचारणा झालीय.

भाजपा नगरसेवक दिनकर पाटील हे लवकरच राज ठाकरे यांच्या उपस्थितीत मनसेत प्रवेश करणार आहेत. तसेच नाशिक पश्चिम मतदारसंघातून त्यांना उमेदवारी देण्यात येईल, असं मनसेकडून सांगितलं जात आहे. तसेच मनसेकडून नाशिक जिल्ह्यातील १४ विधानसभा मतदारसंघांसाठी लवकरच उमेदवार जाहीर होतील, असंसुद्धा मनसे पदाधिकारी सलीम शेख यांनी सागितलंय. २००६ रोजी मनसेची स्थापना झाली आणि २००७ मध्ये मनसेने महाराष्ट्रातील महापालिकेच्या निवडणुका लढवल्या, यात मुंबई महापालिकेत ७, पुणे महापालिकेत ८, नाशिक महापालिकेत १२ आणि ठाणे महापालिकेत तीन नगरसेवक निवडून आलेत, यानंतर नाशिकमध्ये २००९ च्या विधानसभा निवडणुकीत मनसेचे राज्यात १३ आमदार निवडून आलेत, यात नाशिक शहरातील ३ आमदार होते. यानंतर २०१२ मध्ये राज ठाकरे यांच्या करिष्माच्या जादूने नाशिक महानगरपालिकेवर मनसेचा झेंडा फडकवला. तब्बल ४० जागांसह सलग पाच वर्ष मनसेने नाशिक महानगरपालिकेवर सत्ता उपभोगली, मात्र २०१७ च्या निवडणुकीत मोदींच्या लाटेमुळे अवघ्या पाच जागांवर मनसेला समाधान मानावे लागले.

राज ठाकरे यांचे नाशिकवर विशेष प्रेम: सुरुवातीपासून राज ठाकरे यांचे नाशिकवर विशेष प्रेम आहे. मनसेच्या सत्ता काळात नाशिकचा विकास झालाय, त्यात वाहत्या पाण्यावरील शंभर फुटी कारंजा, बोटॅनिकल गार्डन, होळकर पुलावरील वॉटर कर्टन, शहरातील रिंग रोड यांसारखी अनेक कामे झालीत. विशेष म्हणजे कुठल्याही प्रकारच्या निधीचा महापालिकेवर भार पडू न देता सीएसआर निधीतून ही कामे राज ठाकरे यांनी केल्याचं मनसे पदाधिकाऱ्यांनी सांगितलं.

## विविध वृत्त...

### बुलढाण्याची जागा शिवसेना उबाठा कडेच ?; काँग्रेसची पहिली यादी जाहीर



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : अखिल भारतीय काँग्रेसची पहिली यादी रात्री उशिरा जाहीर करण्यात आली असून, या यादीत बुलढाण्याचा समावेश नसल्याने बुलढाण्याची जागा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडेच राहणार असल्याचे यावरून अंदाज वर्तविला जात आहे. तर नेत्यांनी कितीही विरोध केला तरी, जयश्री शेळके याच महाविकास आघाडीच्या उमेदवार राहणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. तर दुसरीकडे, चिखलीत पुन्हा एकदा भाजपच्या विद्यमान आमदार श्वेताताई महाले व राहुल बोंद्रे यांच्यात लढत होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. चिखलीतून काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल बोंद्रे यांना तर मलकापुरातून आ. राजेश एकडे यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. आज जाहीर झालेल्या यादीत ४८ उमेदवारांचा समावेश आहे.

### रामटेक विधानसभेच्या जागेवरुन मविआत 'हाय व्होल्टेज ड्रामा', ठाकरेंनी उमेदवार जाहीर केल्यानंतरही काँग्रेसकडून हालचालींना वेग

**नागपूर/प्रतिनिधी** : महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ ची रणधुमाळी सुरु झाली आहे. राज्यात महायुती विरुद्ध महाविकास आघाडी सामना रंगणार असून सर्वच राजकीय पक्षांनी जोरदार तयारी केली आहे. आता महाविकास आघाडीत रामटेक विधानसभा मतदारसंघावरून बिघाडी झाल्याचे दिसून येत आहे.

नागपूर जिल्ह्यातील रामटेक विधानसभा मतदारसंघ महाविकास आघाडीच्या जागा वाटपात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षासाठी ही जागा जाहीर करण्यात आली आहे. काल शिवसेनेच्या ठाकरे गटाच्या पहिल्या यादीत राम टेक मधून विशाल बरबटे यांचा उमेदवार म्हणून नाव जाहीर झालं असलं, तरी काँग्रेसने अद्यापही रामटेक संदर्भातली आपली भूमिका मवाळ केलेली नाही, काँग्रेसने रामटेक संदर्भातले प्रयत्न अजूनही सोडलेले नाही.

राजकारणात जी गोष्ट आज असते ती दुसऱ्या दिवशी नसते

काँग्रेसला अपेक्षा आहे की, यासंदर्भात आज पुन्हा चर्चा होऊन रामटेकबद्दल घेण्यात आलेल्या निर्णयाचा पुनर्विचार होऊ शकतो. ''राजकारणात जी गोष्ट आज असते ती दुसऱ्या दिवशी नसते'' असं काँग्रेसच्या काही पदाधिकाऱ्यांना वाटतंय आणि त्यामुळे काँग्रेसचे अनेक नेते महाविकास आघाडीच्या जागा वाटपात रामटेकची जागा शिवसेना ठाकरे गटाऐवजी काँग्रेससाठी सोडली जाईल, अशी अपेक्षा राजेंद्र राजेंद्र मुळक यांच्यासह अनेक काँग्रेस पदाधिकाऱ्यांना आहे.

महाविकास आघाडीत हाय व्होल्टेज ड्रामा


राजेंद्र मुळक हे राज्याचे माजी ऊर्जा व वित्त राज्यमंत्री आहेत. ते पृथ्वीराज चव्हाण यांचे अत्यंत विश्वासू असून त्यांची इच्छा असलेल्या रामटेक मतदारसंघात अखेरच्या क्षणी चमत्कार होईल अशी अपेक्षा काँग्रेसच्या गोटात कायम आहे. त्यामुळे महाविकास आघाडीच्या नेत्यांनी काल ८५-८५-८५ असा सूत्र सांगत महाविकास आघाडीत सर्व काही आलबेल असल्याचा दावा केला असला तरी रामटेकसारख्या अनेक मतदारसंघांच्या माध्यमातून महाविकास आघाडीमधील हाय व्होल्टेज ड्रामा अजून शिल्लक असल्याचे दिसून येत आहे.

मविआचं २७० जागांवर एकमत

दरम्यान, महाविकास आघाडीच्या नेत्यांची गेल्या काही दिवसांपासून जागावाटपाच्या मुद्यावर चर्चा सुरु होती. अखेर यावर तोडगा निघाला असून ८५-८५-८५ असा जागावाटपाचा फॉर्म्युला ठरला आहे. २७० जागांवर एकमत झाल्याचे संजय राऊत यांनी म्हटले आहे. तर ८५-८५-८५ या जागांवर मिळून एकूण २७० जागांवर एकमत झालं आहे. उर्वरित १८ जागांवर शेकाप, कम्युनिस्ट, समाजवादी पक्षांसोबत चर्चा सुरु आहेत. या जागांवर आमच्यामध्ये स्पष्टता येईल. महाविकास आघाडी म्हणून ही निवडणूक लढत आहोत. महाराष्ट्रात मविआचं सरकार येणार, असा विश्वास नाना पटोले यांनी व्यक्त केलाय.

### रणबीर कपूरची बहीण रिद्धिमा एकेकाळी पडली होती या अभिनेत्याच्या प्रेमात

**मुंबई/प्रतिनिधी** : बॉलीवूड अभिनेता रणबीर कपूरची बहीण आणि ऋषी-नीतू कपूर यांची मुलगी रिद्धिमा कपूर साहनी सध्या तिच्या नेटफ्लिक्स शो 'फॅब्युलस लाईव्हज ऑफ बॉलीवूड वाइव्हज'मुळे चर्चेत आहे. तिने अलीकडेच ओटीटीमधून पदार्पण केले आहे. या शोचा हा तिसरा सीझन आहे, ज्यामध्ये नेहमीप्रमाणे भावना पांडे, महिप कपूर, नीलम कोठारी आणि सीमा सजदेह दिसणार आहेत. या सर्व बायका यापूर्वी या शोच्या पहिल्या सीझनमध्येही दिसल्या होत्या. यावेळी रिद्धिमा कपूरनेही शोमध्ये प्रवेश केला आहे. शोच्या सुरुवातीलाच रिद्धिमाने असे काही बोलले, ज्याने सर्वांनाच धक्का बसला आहे.



'फॅब्युलस लाइव्हस ऑफ बॉलीवूड वाइव्हज' या शोच्या या सीझनमध्ये कल्याणी शहा चावला, शालिनी पासी आणि रिद्धिमा कपूर यांच्या नवीन एंट्री आहेत. या शोची निर्मिती करण जोहरच्या प्रोडक्शन हाऊस धर्माने केली आहे. शोच्या आगामी एपिसोडमध्ये सर्व बायका दिल्लीतील एका पार्कमध्ये असतील. रिद्धिमाने शोमध्ये असे काही केले की सर्व पत्नींना आश्चर्याचा धक्का बसला.

# लोकांच्या भल्यासाठी लोकांनी महायुतीचे उमेदवार मोठ्या संख्येने विजयी करावेत - केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी** : एक रुपयात पिकविमा मुळे शेतकऱ्यांचा मोठा फायदा झाला असून किसान सन्मान निधीच्या माध्यमातूनही शेतकऱ्यांना केंद्र व राज्य पैसे देत आहे. लाडकी बहीण योजनेमुळे महिलांचा सन्मान वाढविला गेला आहे. सर्वसामान्य नागरिकांच्या हितासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने मोठ्या प्रमाणात योजनांच्या माध्यमातून लाभ मिळवून दिला आहे. म्हणून लोकांच्या भल्यासाठी लोकांनी महायुतीचे उमेदवार मोठ्या संख्येने विजय करावे, असे आवाहन केंद्रीय आयुष्य आरोग्य कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केले.

महायुतीच्या वतीने आज प्रतापराव जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत विधानसभा मतदारसंघाचे उमेदवार म्हणून आमदार संजय रायमुलकर यांनी आपला उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कडे दाखल केला. त्यानंतर शिवसेना कार्यालयापासून हजारो नागरिकांच्या सहभागात रॅली वाटिका चौक ,लोणार वेस, मुख्य बाजारपेठ या मार्गे डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथून स्वातंत्र्य मैदानावर आली. रॅलीमध्ये हजारो महिला व पंधरा गावची भजनी मंडळी सुद्धा सहभागी झाली होती. मंत्री प्रतापरावजी जाधव व आमदार संजय रायमुलकर हे सुशोभित केलेल्या बैलगाडीवर विराजमान होते. शिवसेना जिंदाबाद बाळासाहेब ठाकरे जिंदाबाद मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा विजय असो अशा घोषणांच्या निनादाने रॅलीमध्ये एक वेगळे चैतन्य निर्माण झाले होते.





रॅलीमुळे शहरातील काही प्रमुख मार्ग जाम झाले होते. आपल्या घणाघाती भाषणात प्रतापराव जाधव पुढे म्हणाले की, बाळासाहेब ठाकरे गर्वसे कहो हम हिंदू है असे म्हणायचे, पण आता उबाठाची पूर्ण काँग्रेस झालेली असल्यामुळे आणि ते काँग्रेसच्या मांडीला मांडी लावून बसलेले असल्यामुळे गर्वसे कहो, असे उद्धव ठाकरे म्हणू शकत नाहीत. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेना हीच खरी शिवसेना आहे. महायुती सरकारने जनहिताच्या योजनांच्या माध्यमातून लोकांचा मोठा फायदा करून दिलेला असल्यामुळे या कामांची जाणीव कार्यकर्त्यांनी लोकांना घरोघर जाऊन करून देणे महत्त्वाचे आहे.

यावेळी भाषण करताना उपस्थित मोठा जनसमुदाय पाहून आमदार संजय रायमुलकर भावनाविवश झाले होते. मायबाप जनता हाच माझा परिवार आहे .त्यांना दैवत मानून मी त्यांच्या सेवेत अहोरात्र कार्यरत आहे. मोठ्या प्रमाणात विकास कामेही झालेली आहेत. हा विकासरथ पुढे न्यायचा आहे .म्हणून जनतेने धनुष्यबाण चिन्हाला मत देऊन मोठ्या मताधिक्याने विजयी करावे ,असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी शिवसेनेचे बाजार समिती सभापती माधवराव जाधव, जिल्हाप्रमुख बळीराम मापारी, युवा सेनेचे जिल्हाप्रमुख ऋषी जाधव ,महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष मायाताई मस्के , वैशालीताई सावजी ,राजश्रीताई जाधव ,राजेंद्र गाडेकर, तालुकाप्रमुख सुरेश तात्या वाळूकर, भगवानराव सुलताने, युवासेनेचे भूषण घोडे ,शहर प्रमुख जयचंद बाटिया ,पांडुरंग सरकटे, भारतीय जनता पक्षाचे प्रल्हाद अण्णा लष्कर, जिल्हा उपाध्यक्ष बलदेवराव चोपडे, अर्जुनराव वानखेडे, विजय मापारी, ठोकळ महाराज, अक्षय दीक्षित, सारंग माळेक राष्ट्रवादी काँग्रेसचे गिरीधर पाटील, गजानन सावंत, त्याचप्रमाणे बबनराव तुपे ,बबनराव भोसले ,राजेंद्र पळसकर, रामराव म्हस्के, डॉ. केशव अवचार, दत्ता खरात, विजय सानप ,डॉ. काशिनाथ घुगे ,संतोषराव देशमुख, सुमनताई तायडे ,हर्षल कुसळकर, कैलास चौरे, हर्षल गायकवाड, भास्करराव राऊत ,अशोक वारे, उदय सावजी, राजू मुंदडा, ललित इन्नानी ,समाधान साठे, मनोज जाधव, मंगेश तट्टे ,समाधान सास्ते ,पिंटू सर्जन, ओम सौभागे, माधव तायडे, संतोष चनखोरे, तौफिक कुरेशी, समाधान साबळे ,भास्करराव राऊत ,रविराज रहाटे, माधवराव आरसोडे ,पंजाबराव इंगळे ,खंडू सवडतकर आदी प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी राजेंद्र गाडेकर बलदेवराव चोपडे गिरधर पाटील चैतन्य महाराज बळीराम मापारी यांचे भाषणे झाली.

यावेळी वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवार ऋतुजा चव्हाण यांच्या सासू निशाताई चव्हाण यांनी शिवसेनेत प्रवेश घेतला. मंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जयचंद बाठिया यांनी केले.

# निवडणूक खर्च निरीक्षकांनी घेतला निवडणुकी संदर्भात आढावा






दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी** : मेहकर विधानसभा निवडणुकी संदर्भात दि.२४ ऑक्टोबर २०२४ रोजी दुपारी ३ वाजता मेहकर विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक खर्च निरीक्षक नवनीत कुमार यांनी त्यांच्या पथकासह निवडणुक निर्णय अधिकारी, उपविभागीय अधिकारी, नवीन प्रशासकीय इमारत, (खंडाळा) मेहकर येथे विधान सभा सार्वत्रिक निवडणुक २०२४ अंतर्गत कार्यरत सर्व कक्ष, निवडणुक खर्च कक्ष, नामनिर्देशन कक्ष, पोस्टल बॅलेट कक्ष, आदर्श आचार संहीता कक्ष, मतदार सहायता कक्ष, ई.व्ही.एम. सुवीधा कक्ष यासह विविध पक्षांची प्रत्यक्ष भेट देऊन निवडणूक विषयक कामाकाजाचा आढावा घेतला.

विधानसभा सार्वत्रिक निवडणुक मेहकर विधानसभा मतदार संघासाठी निवडणुक कार्यक्रम घोषीत करण्यात आलेला आहे.दि.२२ ऑक्टोबर रोजी निवडणुक कार्यक्रमाची अधिसुचना प्रसिध्द करण्यात येणार आली असून दि. २९ ऑक्टोबर पर्यंत नामनिर्देशन पत्र स्विकारल्या जाणार आहेत. नामनिर्देशन पत्राची छाननी दि. ३० ऑक्टोबर २०२४ रोजी होणार असुन दि. ४ नोव्हेंबर २०२४ रोजी पर्यंत नामनिर्देशनपत्र मागे घेण्याची अंतिम मुदत असणार आहे. दि.२०नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. दि.२३ नोव्हेंबर २०२४ रोजी मतमोजणी ची प्रक्रीया होणार आहे. याबाबत निवडणूक खर्च निरीक्षक नवनीत कुमार यांनी आढावा घेऊन निवडणुक विषयक कामकाज जलद व गुनवत्तापुर्ण होणे करीता आवश्यक मार्गदर्शन केले. सदर आढावा बैठकीला निवडणुक निर्णय अधिकारी रविंद्र जोगी, सहा. निवडणुक निर्णय अधिकारी निलेश मडके,सहा. निवडणुक निर्णय अधिकारी,भुषनकुमार पाटील, सहा. निवडणुक निर्णय अधिकारी रामराजे कापरे व इतर निवडणुक अधिकारी, कर्मचारी प्रामुख्याने उपस्थीत होते.

### यशवंत माने यांच्या विरोधात महाविकास आघाडीचा कोण? मोहोळमध्ये आघाडीत इच्छुकांची भाऊगर्दी

दैनिक आपला विदर्भ

**सोलापूर/प्रतिनिधी :** मोहोळ राखीव विधानसभा जागेवर राष्ट्रवादी अजित पवार गटाचे विद्यमान आमदार यशवंत माने यांना पुनश्च दुसऱ्यांदा संधी देण्यात आली आहे. मात्र दुसरीकडे इच्छुकांची भाऊगर्दी झालेल्या महाविकास आघाडीमध्ये उमेदवारीची लॉटरी कोणाला मिळणार, याची सार्वत्रिक उत्सुकता कायम आहे. सोलापूर जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे बबनराव शिंदे (माढा) व त्यांचे बंधू संजय शिंदे (राष्ट्रवादी- अजित पवार पुरस्कृत अपक्ष, करमाळा) या दोघांनी शेवटच्या क्षणी अजित पवार यांची साथ सोडून अन्य पर्याय निवडला आहे. तिसरे अजितनिष्ठ मोहोळचे आमदार यशवंत माने यांनी मात्र अजित पवार यांच्यावरील निष्ठा राखली आहे.

त्यामुळे या पक्षाची उमेदवारी त्यांना मिळाली आहे. मोहोळ तालुक्यातील वजनदार नेते, माजी आमदार राजन पाटील- अनगरकर यांचे भक्कम पाठबळ हेच आमदार यशवंत माने यांचे प्रमुख भांडवल मानले जाते. दुसरीकडे महाविकास आघाडीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाकडे ही जागा समजली जाते. त्यामुळे या पक्षात इच्छुकांची संख्या २६ वर पोहोचली आहे. यात भाजपमधून शरद पवार गटात घर वापसी करण्याच्या तयारीत असलेले माजी मंत्री प्रा. लक्ष्मण ढोबळे यांचे पुत्र अभिजित व कन्या कोमल साळुंखे-ढोबळे यांच्यासह पूर्वाश्रमीचे भाजपचे संजय क्षीरसागर, माजी आमदार रमेश कदम, सोलापूरच्या माजी महापौर प्रा. सुशीला आबुटे आदींचा त्यात समावेश आहे. यापैकी कोणाला उमेदवारी मिळणार, याकडे सर्वांचे डोळे लागले आहे.

# जनावार चोरट्याकडून ५ लाख २५ हाजाराचा मुद्देमाल जप्त; आरोपीस अटक

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी:** चार जनावरासह सराईत चोरट्याला ५ लाख २५ हजार रुपयांच्या मुद्देमाल ताब्यात घेतला. ही कारवाई बीबी पोलिसांनी २४ ऑक्टोबर रोजी दुपारी ३ वाजता च्या सुमारास केली. घटनेबाबत प्राप्त माहितीनुसार बिबी स्टेशन हद्दीत दि.२१ ऑक्टोबर रोजी एक बोलोरो पिकांमध्ये चोरीचे जनावरे घेऊन जात असल्याचा संशय पोलिसांना आला. पोलिसांनी त्या वाहनाचा पाठलाग केला असता सदर वाहन दुसरबीड टोल नाक्यावरून समृध्दी महामार्गावर गेले. या वाहनाचा पाठलाग छत्रपती संभाजी नगर पर्यंत केला. परंतु छत्रपती संभाजीनगर येथे सावंगी नाका भागात पिकअप वाहन चालकाने पोलीसांची नजर चुकवुन वाहन पसार केले. त्यानंतर छत्रपती संभाजीनगर येथील पोलीसांना माहिती देवुन बिबी पोलीस स्टेशनच्या पथकाने कसुन तपास करुन छत्रपती संभाजी नगर येथील हर्सुल, सावंगी नाका, गणोरी भागात बोलोरो पिकअप वाहन व आरोपी व चोरुन नेलेली जनावरे यांचा शोध घेत असताना जनावर चोरी करणाऱ्या टोळी चा मोरक्या पोलीसांना मिळुन आला. त्याला ताब्यात घेवुन विचारपूस केली असता बिबी पोलीस स्टेशन हद्दीतील किनगाव जट्टु येथून चोरुन नेलेले ५ जनावरे हर्सूल भागातुन आरोपीचे कब्जातुन पोलीसांनी पंचासमक्ष जप्त केले. मुख्य आरोपी शेख रहीम शेख खमरुददीन वय ३२ रा. हर्सूल ग्रीणपार्क सोसायटी यास अटक केली.

नमुद आरोपी यास पोलीस कोठडी दरम्यान गुन्ह्यासबंधाने विचारपुस करुन दि.२३ ऑक्टोबर रोजी पुन्हा छत्रपतीसंभाजी नगर येथुन जनावर चोरी करणारे आरोपी चोरी करण्यासाठी वापरत असलेले बोलोरो पिकअप वाहन सेंट्रल नाका सिडको पोलीस स्टेशन हद्दीतुन जप्त




करण्यात आले. बिबी पोलीस स्टेशन येथे चोरी गेलेली ४ जनावरे व ४ लाख रुपये किमतीचे एक बोलेरो पिकअप वाहन असा एकुण ५ लाख २५ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

बिबी पोलीस स्टेशन येथे पोलीस कोठडीमध्ये असलेला आरोपी शेख रहीम शेख खमरुददीन वय ३२ रा. हर्सूल ग्रीणपार्क सोसायटी छत्रपती संभाजी नगर याची अधिक चौकशी केली असता देऊळगाव राजा, सिंदखेड राजा, किनगाव राजा, जानेफळ पोलीस स्टेशन हद्दीतील एकुण १० गुन्हे उघड झाले. सदर तपासात गुन्ह्यातील इतर आरोपी निष्पन्न झाले आहेत. या गुन्ह्याचा तपास ठाणेदार संदिप पाटील यांच्या मार्गदर्शनात परमेश्र्वर शिंदे, गजानन चतुर, अरुण सानप, भारत ढाकणे, रविंद्र बोरे, यशवंत जैवळ, ऋषीकेश खंडेराव (सायबर सेल) हे करीत आहेत.